# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.07.2026** **वार:बुधवार**

---

**ठळक बातम्या**

1. **पेपरफुटी प्रकरणी कठोर शिक्षेची तरतूद असणाऱ्या सुधारणा विधेयकावर आजही लोकसभेत चर्चा होणार**
2. **नीट पेपरफुटी प्रकरणातील 13 आरोपीविरुद्ध सीबीआयकडून आरोपपत्र दाखल**
3. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चस्तरीय बैठकीतून घेतला वित्त, वाणिज्य उद्योग क्षेत्राचा आढावा**
4. **झारखंडमध्ये नक्षलवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठं यश आणि**
5. **राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंची आगेकूच; 2 सुवर्ण पदकांसह 12 पदकांची कमाई**

**कामकाज**

लोकसभेत काल 'सार्वजनिक परीक्षेतील गैरप्रकार रोखणाऱ्या सुधारणा विधेयकावरील चर्चा पुन्हा सुरू होईल. या कायद्यात अनेक महत्त्वपूर्ण तरतुदींचा समावेश आहे. यामध्ये दहा वर्षांपर्यंतची कारावासाची शिक्षा, दहा कोटी रुपयांपर्यंतचा दंड आणि दोषी ठरलेल्या गुन्हेगारांची मालमत्ता जप्त करणं यांसारख्या कठोर शिक्षांचा समावेश आहे. या खटल्यांचा जलद न्याय निवाडा होण्यासाठी प्रत्येक राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशानं सुनावणीसाठी विशेष जलदगती न्यायालयं' स्थापन करणं या कायद्यानुसार अनिवार्य होणार आहे. तसंच पोलीस ठाण्यात माहिती नोंदवल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत गुन्ह्यांचा तपास पूर्ण करणे आणि आरोपपत्र दाखल झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत खटल्यांचा निकाल लावणे, अशा तरतुदीही यात करण्यात आल्या आहेत. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी हे विधेयक सादर केलं. हे विधेयक देशातील विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचं ते म्हणाले.

सरकारच्या या प्रस्तावित सुधारणा हा केवळ देखावा असून शिक्षण क्षेत्रात खऱ्या सुधारणा घडवण्यात सरकार अपयशी ठरलं आहे, असा आरोप काँग्रेसनं केला केला. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी, गौरव गोगोई, खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारवर टीका केली. 2024 मध्ये पेपरफुटी प्रतिबंधक विधेयक मंजूर झाल्यापासून एकाही आरोपीला या अंतर्गत शिक्षा झाली नसल्याचा दावा काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी केला तर काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनी हे विधेयक केवळ दिखाव्यासाठी असल्याचं म्हटलं.

भाजपाच्या बासुरी स्वराज, तेजस्वी सूर्या, अनुराग ठाकूर, तसंच शिवसेनेचे श्रीकांत शिंदे, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांनीही या चर्चेत भाग घेतला.
दरम्यान, विद्यार्थी आंदोलकांवर पोलीसांनी केलेल्या कारवाईच्या मुद्द्यावरून राज्यसभेत विरोधकांनी केलेल्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज काल दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**सर्वोच्च न्यायालय**

जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलनात सहभागी झालेल्या 18 वर्षांखालील आणि कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या विद्यार्थी आंदोलकांची सुटका करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. तसंच, या आंदोलनांशी संबंधित इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल पुरावे जतन करण्याचे आदेशही न्यायालयानं अधिकाऱ्यांना दिले आहेत. या आंदोलनात विद्यार्थी आणि पोलीस अधिकारी जखमी झाल्याच्या आरोपांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी होणं आवश्यक असल्याचं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं आहे. आंदोलनादरम्यान पोलिसांकडून बळाचा अतिवापर झाल्याचा आरोप करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च

न्यायालयानं अनेक अंतरिम निर्देश जारी केले आहेत. नीट पेपरफुटीनंतरच्या आंदोलनात महाराष्ट्रातील आंदोलक विद्यार्थ्यांविरोधात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

**सीबीआय**

नीट यूजी पेपरफुटी प्रकरणातील 13 आरोपीविरुद्ध सीबीआयनं काल दिल्लीतल्या विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केलं. गुन्हेगारी कट रचणे, फसवणूक, पुरावा नष्ट करणे असे विविध आरोप या आरोपपत्रात आहेत. नीट पेपरफूटी प्रकरणी सीबीआयने राज्यातील पुणे, लातूरसह राजस्थान हरियाणा आणि दिल्लीत छापे टाकून आरोपींना अटक केली; हे सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

**पंतप्रधान बैठक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सरकारच्या सचिवांसमवेत झालेल्या दुसऱ्या उच्चस्तरीय बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवलं. यामध्ये वित्त आणि अर्थव्यवस्था, वाणिज्य आणि उद्योग, तंत्रज्ञान क्षेत्रांशी संबंधित मंत्रालयं आणि विभागांच्या भविष्यातील कृती धोरणांचा आढावा घेतला. विकसित भारताच्या उद्दीष्टांच्या दिशेने प्रगतीचा वेग वाढवण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. सर्व मंत्रालये आणि विभागांनी समन्वयानं काम करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी या बैठकीत केलं. प्रत्येक निर्णय, धोरणाच्या केंद्रस्थानी देशाचे नागरिक असले पाहिजेत असं मोदी यांनी नमूद केलं.

**राष्ट्रपती-कार्यकाळ**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या कार्यकाळाला चार वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विविध उपक्रमांचा प्रारंभ करण्यात आला आहे. काल राष्ट्रपती भवनात एका विशेष पुस्तक प्रकाशन समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती या प्रदर्शनाच्या अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पाच  पुस्तकांचं  प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रपतीपद हा केवळ एक सन्मान नसून ती एक मोठी जबाबदारी असल्याचं राष्ट्रपती आपल्या भाषणात म्हणाल्या. आदिवासी समुदायांनं आपला सांस्कृतिक वारसा जपत विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावं असं आवाहनही मुर्मू यांनी केलं.
राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळात राष्ट्रपतींना मिळालेल्या 300 भेटवस्तूंचा लिलाव सुरु करण्यात आला आहे. या लिलावात येत्या 5 ऑगस्ट ते 5 सप्टेंबरपर्यंत भाग घेता येईल.

**व्याघ्र दिन**

आज जगभरात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन साजरा करण्यात येत आहे. यंदाची संकल्पना "स्थानिक आणि आदिवासी समुदायांना केंद्रस्थानी ठेवून वाघांचे भविष्य सुरक्षित करणे" अशी आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात सुमारे 3 हजार 682 वाघ आहेत. जगातील 70 टक्क्यांहून अधिक वन्य वाघ भारतात आढळतात.
तज्ज्ञांच्या मते, भारताने व्याघ्र संवर्धनात उल्लेखनीय यश मिळवले असून, भविष्यातही ही वाटचाल अधिक बळकट करण्याची गरज आहे.

**झारखंड-नक्षलवाद**

झारखंडमध्ये नक्षलवादविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठं यश मिळाले आहे. 1 कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर असलेला माओवाद्यांचा वरिष्ठ नेता आणि 'पोलितब्युरो'चा सदस्य मिसिर बेसरा याला धनबाद-गिरिडीह सीमेवरून अटक करण्यात आली आहे. 15 लाख रुपयांचं बक्षीस असलेला 'मेहनत' ऊर्फ 'मोच्छू' आणि माओवादी कार्यकर्ता गौरव यांनाही ताब्यात घेण्यात आलं. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

**ट्रंप-झेलेन्स्की**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी काल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की आणि इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांच्याशी स्वतंत्र बैठका घेत चर्चा केली. या दोन्ही बैठका सकारात्मक आणि फलदायी झाल्याचं व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरोलिन लेविट यांनी समाज मध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या भेटीसाठी आणि रशियानं युक्रेन युद्धात

कीव्हच्या मदतीसाठी  रिपब्लिकन प्रशासनानं केलेल्या प्रयत्नांबद्दल झेलेन्स्की यांनी ट्रम्प यांचे समाज मध्यमावरून आभार मानले.

**<u>जपान भूकंप</u>**

जपानमधील कुमामोटो प्रांताच्या दक्षिणेकडील भागात काल 7 पूर्णांक 1 रिख्टर तीव्रतेचा भूकंप झाला. यात 5 जणांचा मृत्यू झालं असून किमान 50 जण जखमी झाले आहेत. सुमारे 3 लाख नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये स्थलांतर करण्याचा सल्ला देण्यात आल्याचं जपानच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितलं. जपानमधील वाहतूक सेवांवरही परिणाम झाला असून विमान उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत.

**<u>विशेषरेल्वे</u>**

गणेशोत्सवासाठी मध्य रेल्वेनं 11 ते 27 सप्टेंबर या कालावधीत 246 गणपती विशेष रेल्वे गाड्यांचं नियोजन केलं आहे. या अंतर्गत मुंबई आणि पुण्याला सावंतवाडी रोड, रत्नागिरी आणि मडगावशी जोडणाऱ्या 184 आरक्षित गाड्यां तसंच दिवा आणि खेड दरम्यानच्या 62 अनारक्षित  गाड्यांचा समावेश आहे. 1 ऑगस्टपासून या गाड्यांचं आरक्षण करता येईल.

**<u>कॉमन वेल्थ पदक कमाई</u>**

ग्लासगो इथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये, भारताची भारत्तोलक  हरजिंदरकौर आणि लांब पल्ल्याच्या शर्यतीतील धावपटू गुलवीर सिंग यांनी उत्कृष्ट कामगिरी करत, रौप्य पदकं जिंकली; तर तीन भारतीय बॉक्सरनी उपांत्य फेरीत धडक मारत देशासाठी आणखी पदकांची निश्चिती केली आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या गुलवीर सिंगनं पुरुषांच्या 10 हजार मीटर शर्यतीत रौप्यपदक पटकावून इतिहास घडवला. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत या प्रकारात पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय ठरला आहे. आत्तापर्यंत दोन सुवर्ण, सात रौप्य आणि तीन कांस्य पदकांसह भारत पदक तालिकेत नवव्या स्थानावर असून, भारताची एकंदर पदक संख्या 12 झाली आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान विभागानं छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि विदर्भात उद्यापर्यंत अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. उत्तर आणि इशान्ये कडील राज्यांसाठी पुढील दोन दिवसांकरिता नारिंगी बावटा जारी केला असून जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तर प्रदेश, झारखंड, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. कर्नाटक, केरळ, कोकण, गोवा, तेलंगणा, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि राजस्थानमध्येही पावसाचा अंदाज आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.